| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी (आस्थापना), पंचायत समिती, परभणी<br>- श्री. एस. बी. धाबे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी<br>- श्रीमती मंजुषा कापसे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-०५-२०११ च्या माहिती अर्जान्वये विकास कामाबाबत विस्तृत स्वरुपात माहिती मागितलेली आहे. ही माहिती आस्थापना व बांधकाम या दोन विभागाकडे असते व माहितीची व्याप्ती जास्त असल्याने ती संकलीत

करुन देणे एका महिन्यात अशक्य होते. तथापि काही माहिती एकत्रित करुन प्रथमतः स्पीड पोस्टाने अपिलार्थीस दिनांक ०८-०८-२०११ रोजी पाठविण्यात आली आहे. उर्वरीत माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अपिलार्थीस त्याची पाहणी देण्यात आली. अपिलार्थी यांनी कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पाहणी केली. व त्याबाबतची पोच अपिलार्थीने दिली आहे ती त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना दिनांक ०८-०८-२०११ रोजी माहिती देण्यात आली आहे असे आयोगाच्या दृष्टोत्पतीस आले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांचे दिनांक ०८-०८-२०११ चे पत्र आयोगापुढे आहे यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, माहिती मिळाली असल्याकारणाने व्दितीय अपील अंतीमतः निकाली काढावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नाथा गौपाळराव खंदारे, पंचशिल नगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (आस्थापना), पंचायत समिती, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी, नगर परिषद, लातूर - श्री. यु.एन.भोसले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १८.०९.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ श्रीमती सय्यद रुकसाना दस्तगीर शेख हमीद यांच्या अर्जासंदर्भात माहिती मागितली आहे. माहिती मोघम स्वरुपात मागितल्यामुळे दि. २१.१०.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पत्राच्या तारखा देण्यात याव्यात, असे कळविले. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी दि. १८.११.२०१० रोजी, जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.१०.२०१० रोजी दिलेले उत्तर बरोबर असल्याचे नमूद करुन अपील फेटाळले आहे. यानंतर दि. १५.०९.२०११ रोजी अपिलार्थीस संबंधित संपूर्ण संचिका पाहण्यासाठी उपलब्ध करुन देऊन त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती देण्याची तयारी दर्शविण्यात आली. अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. १५.०९.२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी माहिती संदर्भातील संचिकेची पाहणी केल्याचे व त्यांचे त्याबाबत समाधान झाले असून सदर कागदपत्रांच्या प्रतींची आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांनी दाखल केलेले द्वितीय अपील ते परत घेत आहेत, असेही म्हटले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, नगर परिषद शाळा, क्र.३२, बरकतनगर, लातूर ३ ४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वनाथराव गणपतराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
बांधकाम विभाग, नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, नगर परिषद, लातूर -प्रतिनिधी -श्री. देशमुख एन.एम.,शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०११ (फेरसादर,दि. ०२.०८.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,

नगर परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयानुसार दि. १५.०२.२०११ रोजी पोस्टाने पाठविली आहे. प्रथम अपिलावरील निर्णय दि. ०८.०२.२०११ रोजीचा आहे. अपिलार्थी आज सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना मुदतीत माहिती मिळाली नाही, असे दिसून येत आहे.

या सर्व बाबी पाहता आयोगाचे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पुन्हा एकदा विनामूल्य पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पुन्हा एकदा विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथराव गणपतराव गायकवाड,ऋणानुबंध, संत ज्ञानेश्वर नगर, खोपेगाव रोड, लातूर - ४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. डी.एस.साळवे,रा.परभणी. : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता,
दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ,
पाटबंधारे विभाग,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ,
पाटबंधारे विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, दक्षता पथक, पाटबंधारे परिमंडळ,औरंगाबाद-प्रतिनिधी - श्री.जी.एम.कादरी, उपविभागीय अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०११ (फेरसादर,दि. ३०.०७.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. डी. एस.साळवे, द्वारा ढेरे निवास, लोकमान्य नगर, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मलंग अब्दुल रहमान मो.इस्माईल, : अपिलार्थी
रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय,उदगीर,
जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर- श्री. अंबेसंगे व्ही. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी,नगर परिषद, उदगीर, जि.लातूर - श्री. चव्हाण एस.टी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २७.०९.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये नगर परिषद कार्यालय,उदगीर यांच्याकडे अपिलार्थी यांनी केलेल्या अर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांचे बरेच अर्ज याबाबत थोडयाफार फरकाने नगर परिषदेकडे आलेले आहेत. या अर्जासंदर्भातील माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस दि.२३.११.२०१० रोजी देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०२.१२.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. तथापि २७ दिवस उशिराने दिलेली आहे.

अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांनी सादर केलेल्या लेखी कागदपत्रांवरुन वकिलनामा दिल्याचे दिसून येत आहे. त्यांच्यातर्फे वकीलही अनुपस्थित आहेत. त्याचप्रमाणे आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने या खंडपीठाकडे सादर केलेल्या अनेक द्वितीय अपील प्रकरणातील सुनावणीच्या वेळी बहुसंख्य प्रकरणात अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याचे दिसून येत आहे, याची दखल आयोग घेत आहे.

अपिलार्थीस माहिती मिळाली आहे. तथापि २७ दिवस उशिराने दिल्याचे दिसून येत आहे. या बाबीची खबरदारी जन माहिती अधिकारी यांना भविष्यात घ्यावी लागेल, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान मो.इस्माईल,रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. काझी अजगर खॉ हयात खॉ, : अपिलार्थी
रा.खंडाळा, ता.जि.हिंगोली.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन, जिल्हाधिकारी, कार्यालय, हिंगोली - श्री. पी. एन. पोले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगाच्या असे निदर्शनास येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १४.०२.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांनी लोकशाही दिनी सादर

केलेल्या अर्जाच्या संदर्भात तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. अपिलार्थी माहिती व्यक्तिशः घेणार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.०८.२०११ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज दि. ०१.०७.२०११ रोजीचा आहे. तदनंतर त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काझी अजगार खॉ हयात खॉ, रा.खंडाळा, ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा, : अपिलार्थी
रा.मानवत, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय,मानवत,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मानवत, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लेखापाल, नगर परिषद, मानवत,जि.परभणी - श्री. यु.आर.दुधाने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जि.परभणी - श्री. जे. एस.सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०१.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी माहितीच्या तपशीलामध्ये -सर्व्हे नं. ५२४ मानवत मोंढयाच्या पाठीमागे पूर्वभागात आज अस्तित्त्वात असलेल्या एकूण रस्त्याबाबत - असे नमूद केले आहे.तथापि याच अर्जातील माहितीचे वर्णन या रकान्यामध्ये -

विकास आराखडयाप्रमाणे एकूण रस्ते किती आहेत - अशी माहिती मागितली आहे. ही माहिती आयोगापुढे केलेल्या युक्तिवादानुसार नगर पालिकेकडे उपलब्ध नाही. ती सहायक संचालक, नगर रचना, परभणी यांच्याकडे उपलब्ध असू शकते. अपिलार्थी यांच्या सर्व्हे नं. ५२४ चे क्षेत्रफळ अंदाजे २५ एकर आहे. या जमिनीअंतर्गत अथवा बाजूने खेटुन जाणाऱ्या रस्त्याबाबतची माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे, असे सुनावणीच्या वेळी दिसून येत आहे. याकरिता सदरची माहिती नगर रचना कार्यालयाकडे असल्याकारणाने जन माहिती अधिकारी,नगर रचना कार्यालय, परभणी यांना एक विशेष बाब म्हणून त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल, असे आयोगाचे मत आहे. याकरिता या प्रकरणी सहायक संचालक, नगर रचना परभणी यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना कार्यालय, परभणी यांनी एक विशेष बाब म्हणून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा, मंत्री गल्ली, मानवत, ता.मानवत, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, मानवत,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहायक संचालक, नगर रचना, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी संचालक,
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,
औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी संचालक,
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद - श्री. प्र.द्र.वझे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद - श्री. अ.प्र.कोहिरकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२.०७.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ११.०५.२०११ रोजीच्या त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कार्यपध्दतीसंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली व माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलमानुसार देय होणारी माहिती विहित मुदतीत दि. ०२.०६.२०११ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढलेले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावरुन अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची खुलासेवजा माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अशी माहिती माहिती अधिकार अधिनियमान्वये देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलिंगअप्पा बोधने (सेवानिवृत्त स्टेनो), प्रतापनगर,नादखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे

विकास महामंडळ, औरंगाबाद   यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नाथा गोपाळराव खंदारे,<br>रा.परभणी. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,सोनपेठ,<br>जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सोनपेठ, जि.परभणी - श्री. एस.ए.जबार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी - प्रतिनिधी - श्री. बी. बी. सोनवणे, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०४.०५.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे सन २००९-११ या दोन वर्षाच्या उपविभागाअंतर्गत पूर्ण झालेल्या व चालू कामाची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करणे एक महिन्यात शक्य नव्हते. तथापि संकलीत करुन अपिलार्थीस दि. १२.०८.२०११ रोजी व्यक्तिशः देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांची यासंदर्भातील पोच दिलेली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नाथा गोपाळराव खंदारे, रा. पंचशिलनगर,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सोनपेठ, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दामोधर शंकरराव घुगे,<br>रा.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,गंगाखेड,<br>जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>गंगाखेड, जि.परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी - श्री. वाव्हळ एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, गंगाखेड, जि.परभणी - श्री. कासले टी.जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत गंगाखेड तालुक्यामध्ये झालेल्या कामांसंदर्भात विविध मुद्यांवर गटनिहाय माहिती मागितली आहे. माहितीशी संबंधित कालावधी सन २००९ ते २०११ असा असून माहितीची व्याप्ती प्रचंड आहे. अपिलार्थी ही माहिती व्यक्तिशः घेणार होते. माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. यानंतर गंगाखेड तालुक्यात राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत झालेल्या कामाची गट निहाय माहिती अपिलार्थीस दि. ०३.०८.२०११ रोजीच्या पत्राद्वारे व्यक्तिशः देण्यात आली आहे. खर्चाची प्रमाणके, हजेरीपत्रके व कॅशबुक या योजने अंतर्गत संबंधित गावच्या पाणलोट विकास समितीकडे ठेवली जातात व त्यामुळे ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे तसेच शासन निर्णयाप्रमाणे सदरील कामे मशिनद्वारे केल्यामुळे हजेरीपत्रक ठेवण्याचा व जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे पतमागणी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थीने ही माहिती मिळाल्याची दिलेली पोच त्यांच्या अभिलेखामध्ये उपलब्ध आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर शंकरराव घुगे,मु.पो.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन नानाराव धवन, : अपिलार्थी
रा.कावलगाव, ता.पूर्णा, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,कावलगाव,ता.पूर्णा, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,पूर्णा,
जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २९.०७.२०११ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती अपुरी दिली आहे, असे अपिलाचे कारण दिले आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील नेमक्या कोणत्या मुद्यांसंदर्भात अपुरी माहिती

मिळाली आहे, हे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावे लागेल. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित मुद्देनिहाय माहिती पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १६-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन नानाराव धवन, रा. कावलगाव, ता.पूर्णा, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, कावलगाव,ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मदन बाळकृष्ण आवटी,<br>रा.टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मदन बाळकृष्ण आवटी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(म-१), तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना- श्री.ए.एस.छडीदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना- प्रतिनिधी - श्री. एस.व्ही.गव्हाणे अ.का.(म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला

युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि.०५.०९.२००९ रोजीच्या (दि.२२.०९.२००९ रोजी प्राप्त)माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे.

१) संचिका क्र.२००८/जमाबंदी/कावि/दि.०७.०२.२००८ मधील निर्णयाची प्रमाणित प्रत.

२) अर्जदार यांच्या अर्जाची प्रमाणित प्रत.

३) संचिकेतील मंडळ अधिकारी यांच्या अहवालाची प्रत.

यापैकी चौकशीवर निर्णय झालेला नाही. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. अर्जदार त्रयस्थ व्यक्ती उल्हास रघुनाथ मुळे यांच्या अर्जाची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. तथापि या अर्जाचे पहिले पृष्ठ टंकलिखित केलेले असून दुसरे पृष्ठ हस्तलिखित असल्याचे दिसत आहे. त्यामुळे अपिलार्थीची सदर अर्ज बनावट आहे, अशी समजूत आहे.

मंडळ अधिकारी यांनी चौकशीसंदर्भात सादर केलेल्या अहवालाची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे.

अपिलार्थीस देण्यात आलेल्या अर्जदाराच्या अर्जाच्या प्रतीची शहानिशा करणे आवश्यक ठरत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी एकाच कार्यालयातील असल्याकारणाने सदर अर्जाची सत्यता तपासण्याकरिताची चौकशी उपजिल्हाधिकारी,जालना (श्री. संजय गायकवाड) यांनी व्यक्तिशः करावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यानंतर अपिलार्थीस यथोचित कळविण्यात यावे व अर्जाची प्रत बनावट असल्याचे दिसून आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपजिल्हाधिकारी,जालना (श्री. संजय गायकवाड) यांनी वर नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिशः कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मदन बाळकृष्ण आवटी, मु.पो.टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(म-१), तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपजिल्हाधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपिलार्थी
रा. बुटखेडा, ता.जाफ्राबाद, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (म-१),
तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना.
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना - श्री. ए.एस.छडीदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना- प्रतिनिधी - श्री.एस.व्ही.गव्हाणे, अ.का(म). | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०५.२००९ (फेरसादर,दि.१९.०१.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी,अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थीस ती माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांची या संदर्भातील पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

आयोगापुढे अपिलार्थी यांच्या जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय, जाफ्राबाद यांना लिहिलेल्या दि. १२.०९.२०११ रोजीच्या पत्राची प्रत आहे. अपिलार्थी यांनी त्या पत्रामध्ये नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. तरी त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा.बुटखेडा,पो. अकोला(देव), ता.जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग,जालना : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
औरंगाबाद :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना- प्रतिनिधी - श्री.ए.जी.कौरवार, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०७.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीची पाहणी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती मिळालेली असून त्याबाबत त्यांचे समाधान झाले आहे. याबाबतची त्यांची पोचस्वाक्षरी जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखावर दिलेली आहे. कागदपत्रांवरुन त्यांना माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकासकुमार बागडी,नाथ गल्ली, सदर बाजार, जालना-४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राम रुस्तुमराव लांडे, : अपिलार्थी
रा.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ),
पैठण, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३३४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राम रुस्तुमराव लांडे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ), पैठण, जि.औरंगाबाद- श्री. का.स.शिंदे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ), पैठण, जि.औरंगाबाद- श्री. एम.एम.खोरगडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.०२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०४.२००९ |

(फेरसादर दि. २३.०३.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००६ - २००८ ते दि. १०.१२.२००८ पर्यंत पैठण डाव्या कालव्यावरील केलेल्या दुरुस्ती कामाची यादी, कि.मी.यादी, काम करणाऱ्या एजंसीचे नाव आणि प्रत्येक कामाच्या मोजमापपुस्तिकेल्या छायाप्रती मागितल्या आहेत. मागितलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे व नेमक्या स्वरुपात मागितलेली नसल्यामुळे माहितीचा स्पष्ट बोध होत नाही. तरी अपिलार्थी यांनी व्यक्तिशः किंवा पूर्वकल्पना देऊन नेमकी जी माहिती पाहिजे आहे यासाठी पाहणी करावी व कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील, असे अपिलार्थीस दि. ३०.०१.२००९ रोजी कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच दि. २०.०२.२००९ रोजी प्रत्यक्ष येऊन माहितीचे अवलोकन करुन मागणीनुसार आावश्यक माहिती घेऊन जावी, असेही कळविलेले आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(९) नुसार अपिलार्थीस मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेता दिलेली पाहणी योग्य ठरत आहे. यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ११.०२.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, "जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०१.२००९ पत्रान्वये अपिलकर्त्यास माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. माहितीचा बोध होत नाही. सुस्पष्ट माहितीची मागणी करावी किंवा व्यक्तिशः कार्यालयात उपस्थित राहून आपणास हवी असलेली माहिती हस्तगत करण्यात यावी असे कळविण्यात आले असल्याचे दिसून आले. अपिल सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित उपकार्यकारी अभियंता यांनी सहमती दर्शविलेनुसार व अपिलकर्ता यांनी मान्य केले प्रमाणे अपिलकर्ता यांनी दि. २०.०२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर(उ) पैठण यांचे कार्यालयास उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करुन मागणीनुसार आवश्यक माहिती प्राप्त करुन घ्यावी असे ठरले." प्रथम अपिलाच्या या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम रुस्तुमराव लांडे, रा. होळकरनगर, अंबड,ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ), पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ), पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख खलिक शेख अहेमद कुरेशी,<br>रा.परतूर, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, परतूर, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद,परतूर,जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख खलिक शेख अहेमद कुरैशी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद, परतूर, जि.जालना - श्री. मनोहर हनमंतराव तुंगनवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, जि.जालना- श्री. सोनवणे चंद्रकांत पांडुरंग | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर,जि.जालना यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे

मागितलेली माहिती सन १९९६ ची आहे. सदरची संचिका उपलब्ध होऊ शकली नाही म्हणून त्यांना अद्यापपावेतो माहिती देण्यात आलेली नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी जुना असल्यामुळे व माहितीची व्याप्ती विचारात घेता अपिलार्थीस माहितीशी संबंधित अभिलेखांची पाहणी देण्यात येईल,असे प्रस्तावित केले. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्यावेळी मान्य केली. या अभिलेखांची पाहणी दि. २६.०९.२०११ रोजी सुनावणीच्या वेळी सर्वानुमते निश्चित करण्यात आली. या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन देण्याची व्यवस्था करावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख खलिक शेख अहेमद कुरैशी, कुरैशी गल्ली, वॉर्ड नं. ५, परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजू भुजंगराव तारे,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| | श्री. तांदळे उध्दव किसनराव,<br>तांदळे निवास, हनुमान चौक, जालना रोड, शाहुनगर, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड<br>- श्री. आत्माराम रंगनाथ वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २९-१२-२००८ च्या माहिती अर्जान्वये न्यायालयीन निर्णयाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक ०३ जानेवारी २००९ रोजी प्रतिसाद दिला असून महाराष्ट्र

जिल्हा न्यायालये माहितीचा अधिकार नियम २००६ अन्वये अर्जदार यांनी केलेला माहितीचा अर्ज नियमानुसार नसल्यामुळे फेटाळलेला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा न्यायालये माहितीचा अधिकार नियम २००६ मधील चॅप्टर २ (९) प्रमाणे न्यायालयीन प्रक्रियेतील कागदपत्रे न्यायालयाने निश्चित केलेल्या कार्यप्रणालीनुसार प्राप्त करुन घेऊ शकतात असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी यावर जन अपिलीय अधिकारी तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड यांच्याकडे दिनांक ०३-०२-२००९ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे असे नमूद केले आहे.

अपिलार्थीचा माहितीचा अर्ज, माहिती अधिकार अधिनियम २००५ तसेच महाराष्ट्र जिल्हा न्यायालये माहिती अधिकार नियम २००६ मधील तरतुदी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तांदळे उध्दव किसनराव, तांदळे निवास, हनुमान चौक, जालना रोड, शाहुनगर, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. किशोर विठ्ठल बाब्रस,<br>फ्लॅट नंबर ९, माणिक अपार्टमेंट, सराफा लेन, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड<br>- श्री. आत्माराम रंगनाथ वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. प्रकरणात त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर विठ्ठल बाब्रस, फ्लॅट नंबर ९, माणिक अपार्टमेंट, सराफा लेन, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे,<br>मु. पो. उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रंथपाल, शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रंथपाल, शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २०-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २५-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०९-०९-२००९<br>फेरसादर दिनांक<br>३०-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी दिनांक २५-०७-२००९ च्या माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

१. त्रयस्थ श्री. सुर्यकांत लांडगे (ग्रंथपाल) यांची शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी या वाचनालयात कर्मचारी म्हणून नियुक्ती झाल्याची तारीख, नेमणूक झालेल्या ठरावाची प्रत व नेमणूक आदेशाची प्रत व त्यास मिळालेल्या मान्यतेची प्रत.

२. वाचनालयास सन २००७-०८ व २००८-०९ या सालात प्राप्त झालेल्या एकूण निधीचा तपशील.

सदरच्या ग्रंथालयास १,२८,००० इतके अनुदान प्रतिवर्षी मिळते असे अपिलार्थी यांनी पुढे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोग घेत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार सदरची माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सरळ आणि सोपी आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रंथपाल, शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार हि माहिती विहित मुदतीत देणे आवश्यक होते तथापि त्यांनी तसे केलेले नाही. आता अपिलार्थीस ही माहिती नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत सुमारे दोन वर्षाचा कालावधी उलटूनही माहिती दिलेली नाही ही बाब विचारात घेता संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रंथपाल, शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांची राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रंथपाल, शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे, मु. पो. उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रंथपाल, शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपिलार्थी

व्दारा, श्री. माणिकराव पांडे निवास, शाकांबरी, भट्टगल्ली, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

शैक्षणिक विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

संचालक (BCUD), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - श्री. एस. के. माळी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक (BCUD), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - डॉ. आर. डी. कपले | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, दिनांक २५-०९-२००९ च्या अर्जान्वये अपिलार्थी यांनी स्वतःच्या नेमणूक प्रस्तावाबाबतची तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दिनांक ०५-१०-२००९ रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाला व त्यांनी दिनांक ३१-१०-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती कळविलेली आहे. अपिलार्थी यांनी दिनांक २७-१०-२००९ रोजी प्रथम अपील दाखल करताना नमूद केले आहे की, त्यांना माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी मिळाली आहे. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-११-२००९ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेऊन उपलब्ध कागदपत्रावरुन निर्णय दिला आहे की, माहिती अधिका-याने उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली असल्यामुळे ती अपूर्ण, चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे असे दिसून येत नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. कागदपत्रावरुन अपिलार्थी प्रथम अपिलामधील सुनावणीस वेळोवेळी अनुपस्थित राहिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १५-१२-२००९ च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना मोघम चुकीची, मोघम व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याचे म्हटले आहे. तथापि नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०९-२०११**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा, श्री. माणिकराव पांडे निवास, शाकांबरी, भट्टगल्ली, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (BCUD), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जिजाबा नामदेव सिरसट, : अपिलार्थी
संजय नगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस स्टेशन, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. संजय महादेव लोहकरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : श्री. मोहन जाधव | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २९-०६-२००९ च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. मोहन जाधव यांची ०१ जानेवारी १९९१ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची विविध चार मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती दिनांक ०१-०८-२००९ रोजी कार्यालयात

उपलब्ध झाल्यानुसार अपिलार्थीस त्याच दिवशी देण्यात आली आहे त्याची पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे. माहिती जुन्या कालावधीची आहे ती संकलीत करुन अपिलार्थीस देण्यात आल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जिजाबा नामदेव सिरसट, संजय नगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अजित एम. देशमुख, | : | अपिलार्थी |
| | व्दारा, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे | | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजित एम. देशमुख, व्दारा, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वाजेद खान पठाण,<br>रा. बालेपीर, अजमेर नगर, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वाजेद खान पठाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. जी. एम. आयनलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी स्वत: वकील आहेत. त्यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्रयस्थ आरेफा अकबर कुरेशी यांनी दिनांक १२-०१-२००९ रोजी रेशन कार्डासाठी दिलेल्या अर्जावर आतापर्यंत काय कारवाई केली व हे काम किती दिवसात पूर्ण व्हायला पाहिजे यावर माहिती मागितली आहे व

अर्जाची प्रत सोबत जोडली आहे. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी आतापर्यंत त्यांना ती माहिती दिलेली नाही. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २०-११-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती द्यावी व तीस दिवसात माहिती देणे आवश्यक असताना सुध्दा माहिती दिली नाही अशी नोंद घेतली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना दिनांक ११-०७-२०११ रोजी नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविण्यात आली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस मिळाली नाही असे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज माहितीची संचिका उपलब्ध आहे ती माहिती आयोगाच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आली अपिलार्थीने ती स्विकारली.

अपिलार्थी यांनी एका त्रयस्थ व्यक्तिला मदत करण्याच्या भावनेने ही माहिती मागितली आहे. तथापि त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे. भविष्यात कागदपत्राच्या स्वरुपात माहिती मागावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा सांगोपांग विचार करता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे आढळून येत नाही व तब्बल दोन वर्षांनी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे ही बाब गंभीर आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब केलेला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता तसेच माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असली तरीही दोन वर्षे कालावधी लागला आहे ही गंभीर बाब पाहता (माहितीचा अर्ज दिनांक १५-०९-२००९ व माहिती देण्याचा दिनांक ११-०७-२०११) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांची राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वाजेद खान पठाण, रा. बालेपीर, अजमेर नगर, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. उध्दव रंगनाथराव रासकर,<br>व्दारा, विशाल खोसे निवास, डॉ. गिरी हॉस्पिटल पाठीमागे, आदर्शनगर, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप आयुक्त (ग्रा. पं. निवडणूक), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद<br>(गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास / आस्थापना शाखा) | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा) | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास / आस्थापना शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. डी. सी. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. प्रकरणात त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उध्दव रंगनाथराव रासकर, व्दारा, विशाल खोसे निवास, डॉ. गिरी हॉस्पिटल पाठीमागे, आदर्शनगर, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास / आस्थापना शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. महादेव उध्दवराव उजगरे,<br>भिमनगर, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जिल्हा बीड - श्री. जी. एन. चोपडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड<br>- श्री. एस. आर. सानप | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२००९<br>फेरसादर<br>दि. १५-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जिल्हा बीड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये महाराष्ट्र दर्शन सवलतीचा लाभ किती शिक्षकांना मिळालेला आहे, भेटीचा तपशील इत्यादी सर्व सन २००८-०९ या कालावधीची माहिती मागितली आहे. ही माहिती फार मोठ्या प्रमाणात आहे ती संकलीत करुन उपलब्ध असलेली माहिती दिनांक २५-०८-२००९ रोजी अपिलार्थीस पाठविली आहे परंतु पाकीट परत आलेले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळालेली नाही असे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव उध्दवराव उजगरे, भिमनगर, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. उमेश किशनराव भावठाणकर,<br>प्रशांत नगर, मातोश्री निवास, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उमेश किशनराव भावठाणकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. एस. एल. बोंबले, निरीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१८-०६-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यालयातील कोणत्या कागदपत्राची प्रत हवी आहे त्याचा चौकशी क्रमांक, निशानी क्रमांक इत्यादी तारखेसह मागणी करावी म्हणजे आपणास माहिती देता येईल असा प्रतिसाद दिनांक २३-०६-२००९ रोजी दिलेला आहे आणि अपिलार्थी यांचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे. यावर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांनी दिनांक ०६-०८-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देऊन अपील फेटाळले आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या अंतर्गत एका शाळेमध्ये ते शिक्षक आहेत त्यांची संस्थेच्या कार्यक्षेत्राखाली एका शाळेतून दुस-या शाळेत बदली केलेली आहे. याबाबत निर्णय किंवा धोरण इत्यादी असल्यास या निर्णयाची, आदेशाची किंवा परिपत्रकाची प्रत त्यांना आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी तथा संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, यांच्याकडे वेगळा अर्ज करावा लागेल व त्यांच्याकडून उपरोक्त माहिती मागवावी लागेल. तेथून माहिती प्राप्त झाली नाही तर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे अपील दाखल करावे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमेश किशनराव भावठाणकर, प्रशांत नगर, मातोश्री निवास, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र देविदास काटे, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार (पु.), : उत्तरवादी
तहसील कार्यालय,बीड

जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, :
तहसील कार्यालय,बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०४.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र देविदास काटे,रा.कौशल्या हॉटेलच्या पाठीमागे, संत नामदेव नगर,धानोरा रोड,बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बालासाहेब सुखदेव सोनवणे,<br>रा.माजलगाव,जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,<br>जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,माजलगाव,जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड- श्री. गायसमुद्रे व्ही. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,माजलगाव,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९<br>(फेरसादर,दि.२१.१२.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००५ ते ०९ अशी मोठया कालावधीची सर्व प्रकारच्या निवडणूका व निवडणूकीच्या अनुषंगाने करावयाची इतर कामे करण्यासाठी निवडणूक आयोग व जिल्हाधिकारी,बीड यांचेकडून तहसीलदार, माजलगाव यांना सन २००५ ते दि. १२.०१.२००९ पर्यंत प्राप्त झालेल्या अनुदानासंदर्भात झेरॉक्स प्रतीसह माहिती मागितली आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे शासकीय कामकाज सांभाळून माहिती संकलीत करण्यास कालावधी लागला. तदनंतर दि. ३१.०३.२०११ रोजी अपिलार्थीस माहिती दिली आहे व त्यासंदर्भातील अपिलार्थीची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचे द्वितीय अपील दि. २९.१०.२००९ रोजीचे आहे. द्वितीय अपील अपूर्ण असल्याकारणाने परिपूर्णता करण्यासाठी परत करण्यात आले होते. अपिलार्थी यांनी दि. २१.१२.२००९ रोजी उर्वरित कागदपत्रे आयोगाकडे सादर केल्यानंतर अपिलार्थीचे द्वितीय अपील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.उपलब्ध कागदपत्रांवरुन या सर्व बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब सुखदेव सोनवणे,रा. भोसले निवास, विवेकानंदनगर, माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गणेश साहेबराव लांडगे,<br>रा.माजलगाव, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड- श्रीराम पाचपुते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, माजलगाव,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे, रा.पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख अहेमद शेख महेबुब,<br>रा.माजलगाव, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,माजलगाव,जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख अहेमद शेख महेबुब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड- श्रीराम पाचपुते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, माजलगाव,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे दि. ०१.०१.२००९ ते जूलै,२००९ या कालावधीत माजलगाव तहसील कार्यालयातील पुरवठा विभागामार्फत त्रयस्थ श्री. गोरख रंगनाथ वापटे व सतिष राठौर यांना वितरित केलेल्या

रॉकेलचा तपशील व त्यांनी वाटप केलेल्या हॉकर व परवानाधारकाचा तपशील मागितला आहे. सध्याच्या जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगापुढे सादर केली. आयोगाच्या सूचनेनुसार ती अपिलार्थीस हस्तांतरित करण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थी यांनी त्यांना आजच माहिती मिळाली असल्याकारणाने त्या माहितीची प्रथम पाहणी करावी व त्यामध्ये अपूर्ण कागदपत्रे असल्यास जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत कळवावे व जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय माजलगाव,जि.बीड यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम २०(१) नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांना जिल्हाधिकारी,बीड यांचेमार्फत आयोगास सादर करावा लागेल.या आदेशाची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांना तात्काळ तामील करावयाची जबाबदारी तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

२) संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,माजलगाव,जि.बीड यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम २०(१) नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी,बीड यांचेमार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २२-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अहेमद शेख महेबुब, इंदिरानगर समोर, मंजरथ रोड, माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश संपतराव सोळंके, : अपिलार्थी
रा.निपाणी टाकळी, ता.माजलगाव,
जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी सजा गुंज खुर्द,
ता.पाथरी, जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय, पाथरी, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सजा गुंज खुर्द, ता.पाथरी, जि.परभणी - श्री. डी. बी. चाटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी, जि.परभणी- श्री. बालाजी अर्जुनराव शेवाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पाथरी, जि.परभणी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०५.०६.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये गट नं. ८१ उमरा, ता.पाथरी या मिळकतीस कोर्ट डिक्रीआधारे फेरफार करुन आवश्यक नोंदी घेण्यासंदर्भात माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(च)मधील 'माहिती'च्या व्याख्येप्रमाणे जी माहिती देय होत आहे, ती माहिती दि. २२.०८.२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि.१८.०९.२००९ रोजीचे आहे. त्यामुळे माहितीची एक प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुन्हा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला आहे. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत प्रथम प्रतिसाद देण्यासंदर्भात दक्ष राहावे, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश संपतराव सोळंके, मु.पो.निपाणी टाकळी, ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा गुंज खुर्द, ता.पाथरी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कांबळे शिरीष मिलींदराव,<br>रा.मोरेवाडी, ता.अंबाजोगाई,<br>जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पुरवठा विभाग, तहसील कार्यालय,अंबाजोगाई, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी, पुरवठा विभाग,<br>तहसील कार्यालय,अंबाजोगाई, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड- श्रीमती एस.एल.जोगदंड/घाडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १०.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये तहसील कार्यालय, अंबाजोगाईमार्फत दि. ०३.११.२००० पासून दि. १०.०७.२००९ पर्यंतच्या कालावधीमध्ये शिधापत्रिका वाटप, रॉकेल पुरवठा, वाढवलेला रॉकेल साठा, स्वस्त धान्य तसेच अर्ज क्र. ०९८५२२७ संदर्भात एकूण सात मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहितीची व्याप्ती जास्त असल्याकारणाने संकलीत करण्यास वेळ लागला व अपिलार्थीस दि. १४.०१.२०१० रोजी काही माहिती व दि. २५.०१.२०१० रोजी सर्व माहिती ४२ पृष्ठे देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी दि. ०१.०२.२०१० रोजी पोचस्वाक्षरी केली आहे. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील २८.०९.२००९ रोजीचे आहे. तदनंतर त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे शिरीष मिलींदराव, व्ही.जे.आरक नगर, मोरेवाडी,ता.अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बप्पासाहेब महादेव शिंदे, : अपिलार्थी
रा.लवूळ नं.१, ता.माजलगाव,जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपजिल्हाधिकारी कार्यालय,अंबाजोगाई,
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी
कार्यालय,अंबाजोगाई,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बप्पासाहेब महादेव शिंदे व त्यांचे वकील ॲड.अशोक गोविंदराव लिंबगावकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड- प्रतिनिधी - श्री. बी.एन.वांजरखेडकर, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व त्यांचे वकील आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी अपिलार्थी व त्यांचे वकील यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे - त्यांच्या स्वतःच्या स.नं७८/३, स.नं.७९ या दोनही जमिनी गावठाणाकरिता संपादित केल्यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. R.B.W.IAR5/64 च्या प्रमाणित प्रती मिळण्यासंदर्भात -अशी माहिती मागितली आहे. माहिती सोपी व सरळ आहे. तथापि आतापर्यंत अपिलार्थीस माहिती प्राप्त झालेली नाही. संचिका उपलब्ध होत नाही, उपलब्ध झाल्यावर माहिती देण्यात येईल, अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे. ही गंभीर बाब आहे. याची नोंद आयोग घेत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी पुढील सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहतील, याची व्यवस्था करावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. बप्पासाहेब महादेव शिंदे, रा.लवूळ नंबर १, ता.माजलगाव,जि.बीड

२.	जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सावंत संभाजी बलभीमराव,<br>रा.कुप्पा, ता.वडवणी, जि.बीड. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,धारुर, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, धारुर, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,धारुर, जि.बीड- श्री. अशोक नांदलगावकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, धारुर, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२००८<br>(फेरसादर,दि. ०७.०७.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १५.१०.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ स्वस्तधान्य दुकानदार श्री. सुंदरराव परसराम सावंत यांची रेशनमाल वाटपाबाबत, कार्डधारकाबाबत, तपासणी झाल्याबाबत व मयत कार्डधारकासंदर्भात एकूण ८ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील नाहीत, यास्तव जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.१२.२००७ रोजी अपिलार्थीस मागितलेल्या माहितीचे ३३६५ इतकी पृष्ठे होत असल्यामुळे ₹६७३०/- कार्यालयात भरुन माहिती हस्तगत करावी असे कळविले. माहिती विस्तृत असल्याने ती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. म्हणून अपिलार्थीस विहित मुदतीत कळविता आले नाही.

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. ०९.०४.२००८ रोजीचे आहे. अपिलार्थीचे द्वितीय अपील अपूर्ण होते. कागदपत्रांची पूर्तता करुन अपिलार्थीने दि. ०७.०७.२००९ रोजी अपील फेरसादर केले आहे. त्याची सुनावणी आज आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तहसीलदार, धारुर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत शुल्काची रक्कम कळविली नसल्यामुळे अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी, असे कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मोठया प्रमाणात आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीस मागितलेल्या माहितीची पाहणी देणे योग्य ठरत आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,धारुर, जि.बीड यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) निश्चित करुन माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. संबंधित अभिलेखांची पहाणी केल्यानंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,धारुर, जि.बीड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संभाजी बलभीमराव सावंत, मु.पो.कुप्पा, ता.वडवणी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,धारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाधव शिवभुषण लक्ष्मणराव, : अपिलार्थी
रा.पाटोदा, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, : उत्तरवादी
ग्रामपंचायत कार्यालय,ईट, ता.भूम,
जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, :
पंचायत समिती, भूम, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,ईट, ता.भूम, जि.उस्मानाबाद- श्री. शिंदे सुभाष सोनराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जि.उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. व्ही. जे. वाघमारे, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२००८ |

(फेरसादर, दि. १७.११.२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २१.०५.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ कुमार अजिंक्य आनंद जाधव या मुलाची जन्मनोंद रद्द करण्याबाबत अपिलार्थी यांच्या दि.१८.०३.२००८ रोजीच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत सत्यप्रतीच्या स्वरुपात माहितीची मागणी केलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी दि. ०३.०६.२००८ रोजी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांच्याकडून मार्गदर्शन मागितले आहे. आजमितीस सद्यस्थितीत काही फरक नाही, असे आयोगास युक्तिवादावरुन दिसून येत आहे. त्याचप्रमाणे सदर त्रयस्थ व्यक्तिच्या जन्मनोंदणीबाबत विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, सद्यपरिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध होऊ शकत नाही, असे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांना प्रकरणी सद्यस्थितीची काही माहिती नाही. त्यामुळे प्रकरणावर प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन दोन्ही बाजूस त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन निर्णय पारीत करण्याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जि.उस्मानाबाद यांचेकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०९-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव शिवभुषण लक्ष्मणराव, पाटीलगल्ली, पाटोदा, मु.पो.ता.पाटोदा,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,ईट, ता.भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र हौसराव देशमुख,<br>रा.गेवराई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - भांडारपाल तथा कार्यालयीन अधीक्षक, न.प.गेवराई, जि.बीड- श्री.विष्णू पांडुरंग पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जि.बीड- श्री. रफिक कंकर सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०६.२००९<br>(फेरसादर,दि. २७.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १३.०३.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ

अर्जान्वये एकूण ३ मुद्यांवर आस्थापना विभागाची माहिती मागितली आहे. मुद्दा क्र. १ ते ३ ची माहिती टपालाद्वारे अपिलार्थीस दि. ३०.०६.२००९ रोजी पाठविली आहे. यातील काही मुद्यांबाबतची माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात नव्हती. तसेच जन माहिती अधिकारी यांची सेवा लोकसभा निवडणूकीतील उमेदवारांच्या खर्चाचा हिशोब ठेवण्यासाठी तहसील कार्यालय,गेवराई येथे अधिगृहित केली होती त्यामुळे माहिती देण्यास अंशतः विलंब झाला आहे. लोकसभा निवडणूकीनंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन अपिलार्थीस दिली आहे.जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १२.०५.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. प्रसंगावशात अपिलार्थी हे त्यांच्याच कार्यालयाचे कर्मचारी असून सध्या निलंबित आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आतापर्यंत त्यांनी १५-२० अर्ज केलेले आहेत याचीही नोंद आयोगाने घ्यावी, अशी त्यांनी विनंती केली. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. २२.०६.२००९ रोजीचे आहे. त्यानंतर त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील अपूर्ण असल्याकारणाने दि. १५.०९.२००९ रोजी तसे आयोगातर्फे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दि. २७.११.२००९ रोजी द्वितीय अपिलाची परिपूर्तता केलेली आहे. यावर आज सुनावणी लावण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई, जि.बीड

२.	जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल तथा कार्यालयीन अधीक्षक, न.प.गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार,<br>रा.उमरी, जि. नांदेड. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, कुंडलवाडी, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, कुंडलवाडी, जि.नांदेड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०१.२००९<br>(फेरसादर,दि.२६.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. प्रकरण सन २००८ चे आहे. त्यामुळे सद्यपरिस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास

आवश्यक वाटत आहे.त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार, रा.महाकाली मंदिराजवळ,उमरी, ता.उमरी, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, मुख्याधिकारी,नगर परिषद, कुंडलवाडी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, कुंडलवाडी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, :
सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी- श्री. बी.बी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी- श्री. जी.एस.खाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०२.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामध्ये काम करीत असलेल्या त्रयस्थ स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचाऱ्यांची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. ही बाब जन अपिलीय अधिकारी यांना पहावी लागेल व कलम ११ नुसार त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल, ही बाब नैसगिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. तदनंतर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे आवश्यक ठरत असल्यास त्याप्रमाणे देय होत असलेली उर्वरित माहिती देण्याबाबतअधिनियमातील तरतुदीनुसार निर्णय घ्यावा लागेल.

याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.११.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील घर क्र.९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष रामराव बनसोडे,<br>रा.मुखेड, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मुखेड,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी<br>कार्यालय,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तारतंत्री निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मुखेड,जि.नांदेड- शेख खलील शेख महम्मद हुसेन | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी - प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मुखेड,जि.नांदेड- श्री. अ.दि.अर्धापूरकर | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी -प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मुखेड,जि.नांदेड- श्री.डी.टी.चढावकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.१०.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, सध्याचे व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००५ ते २००९ या कालावधीची सर्व प्रकारचा निधी प्राप्त झाल्याबाबतची माहिती, खर्चाचा तपशील व कर्मचाऱ्यांच्या मस्टरसह वैद्यकीय रजा, किरकोळ रजा,अर्जित रजा, कार्यालयीन दौरे, सर्व मशिनरीच्या रिपेरिंगच्या खर्चाच्या पावत्या, शाळानिहाय खर्चाच्या सर्व पावत्या, मागासवर्गीय मुलींना देण्यात आलेल्या प्रशिक्षण व शिष्यवृत्तीसंदर्भात सविस्तर माहिती, व वाटप रजिस्टरच्या झेरॉक्स सत्यप्रती अशी एकूण ६ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलमानुसार एक महिन्यात संकलीत करणे शक्य नव्हते. त्यांच्या कार्यालयात मदतीसाठी एकच कारकुन आहे. दैनंदिन कार्यालयीन कामकाज सांभाळून माहिती संकलीत करण्यात आली आहे. त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती दि. २३.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस देण्याकरिता एकूण ८०० पृष्ठे खास दुतामार्फत पाठविण्यात आले होते. अपिलार्थी यांनी ती स्वीकारलेली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहे. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये त्यांनी मोठया कालावधीची विस्तृत प्रमाणात विविध विषयांवर माहिती मागितली आहे, असे दिसून येत आहे.अशाप्रकारची माहिती मागण्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मागील भूमिका व त्यातील उद्दीष्टये सफल होत नाहीत व अपिलार्थीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही, असे आयोगाचे मत आहे. व्यापक माहिती मागितल्याने शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधनसामग्री फार मोठया प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब अधिनियमातील कलम ७(९) नुसार अभिप्रेत नाही. जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता सकारात्मक भूमिका घेतली आहे व दि. २३.१०.२००९ रोजी म्हणजे अपिलार्थीने अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून अडीच महिन्यात माहिती संकलीत करुन झेरॉक्स प्रती तयार करुन ठेवल्याचे दिसून येत आहे. अशी मोठया प्रमाणावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करता अधिनियमातील कलम ७(१) नुसार एक महिन्यात देणे शक्य नाही, ही बाब योग्य आहे. या बाबी विचारात घेता अपिलार्थीस एक संधी देऊन पुन्हा एकदा जी माहिती वरीलप्रमाणे उपलब्ध आहे ती पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी व तसे नोंदणीकृत टपालाद्वारे

कळवावे, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष रामराव बनसोडे,रा.समतानगर,मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तारतंत्री निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद गौस मोहीयोद्दीन सय्यद अहेमद साब, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
मालमत्ता व्यवस्थापक,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद गौस मोहीयोद्दीन सय्यद अहेमद साब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मालमत्ता व्यवस्थापक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड - श्री. गुलाम मो.सादेख जो. समदानी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड - श्री. शशीमोहन ग.नंदा | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०३.२००९ (फेरसादर,दि.२६.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्यात आली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन १९८८ ते १९९३ व २००४ ते २००७ या कालावधीची नांदेड-वाघाळा मनपा अंतर्गत एम.जी.रोड येथील कॉम्प्लेक्स व मोहमद अली रोड व तसेच गणेश टॉकीज रोडवरील दुकानांच्या बांधकामासंदर्भात दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यामध्ये दुकानांची यादी, दरमहा भाडयाची रक्कम, बांधकाम परवानगीची व नकाशाच्या सत्यप्रती या मुद्यांचा समावेश आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक यांनी अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि. ०९.०२.२००९ रोजी प्रथम प्रतिसाद दिला व आवश्यक शुल्काचा भरणा करावा, असे कळविले आहे तदनंतर जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेख्यांमध्ये उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, ते अपिलार्थीस संपूर्ण अभिलेखे दाखविण्यास तयार आहेत. ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली. अतः मागितलेल्या माहितीशी संबंधित संपूर्ण अभिलेख्यांची अपिलार्थी यांनी पहाणी करावी व स्वतः माहितीची खातरजमा करुन घ्यावी.याकरिता जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक यांना एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस यापूर्वी देण्यात आली नसेल, ती माहिती सशुल्क देण्यात यावी व त्यापैकी जी कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस स्पष्टपणे कळवावे लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे यापूर्वी दिलेली नसल्यास सशुल्क देण्याची व्यवस्था करावी,ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद गौस मोहीयोद्दीन सय्यद अहेमद साब, मुतवल्ली, दर्गाह मस्तानशाह वली ऊर्फ सय्यद सादात, रा.एम.जी.रोड, मालमत्ता क्र. ४-३-१३९, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उदयकुमार देविदासराव देशमुख, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता (विद्युत),
औरंगाबाद प्रादेशिक विद्युत मंडळ,
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य अभियंता (विद्युत),मुंबई, सार्वजनिक बांधकाम
विभाग, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उदयकुमार देविदासराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०३.२००९ (फेरसादर, दि.२०.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर

प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उदयकुमार देविदासराव देशमुख, 'संकल्प', १०६, गणेशनगर, नांदेड- ४३१६०२

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (विद्युत),औरंगाबाद प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (विद्युत),मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गंगाधर दिगांबर बडुरे, : अपिलार्थी
रा.बरबडा, ता.नायगाव(खै),
जि.नांदेड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि कार्यालय,नायगाव (खै),
जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी,
नायगाव (खै),जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,नायगाव (खै), जि.नांदेड -श्री. यमलवाड ए.आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, नायगाव (खै),जि.नांदेड - श्री. सोनटक्के एम.के. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२००९ |

(फेरसादर,दि. १८.११.२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांचा दि. १६.१२.२००८ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दूरध्वनीवरुन अपिलार्थीशी संपर्क साधला व त्यांनी मागणी केलेली माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे नेमकी कोणती माहिती पाहिले व कोणत्या कालावधीची पाहिजे ते कळवावे म्हणजे माहिती देण्यास सोयीचे होईल, असे कळविले. अपिलार्थी यांनी दि. २९.०१.२००९ रोजी एक वर्षानंतर प्रथम अपील केले. सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती एकत्रित करुन माहितीचे एकूण ५६५ पृष्ठे आज आयोगापुढे सादर केली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही, असे दिसून येत आहे. अपिलार्थीशी जन माहिती अधिकारी यांनी संपर्क साधला आहे. याबाबतचा लेखी पुरावा दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना कलम ७(६) नुसार अपिलार्थिस माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,नायगाव (खै) यांना वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थिस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्यास दक्ष राहण्याची समज द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाधर दिगांबर बडुरे, मु.पो.बरबडा,ता.नायगाव (खै.)जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,नायगाव (खै), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,नायगाव (खै),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, : अपिलार्थी
रा.पाटोदा (तब),ता.नायगाव,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
पोलीस स्टेशन, कुंटूर, ता.नायगाव,जि.नांदेड : उत्तरवादी
जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस स्टेशन, कुंटूर, ता.नायगाव,जि.नांदेड :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील

कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी,पोलीस स्टेशन, कुंटूर, ता.नायगाव,जि.नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी, पोलीस स्टेशन, कुंटूर, ता.नायगाव,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुपलवाड भागवत आत्माराम,मु.पो.पाटोदा (तब),ता.नायगाव (खै),जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, पोलीस स्टेशन, कुंटूर, ता.नायगाव,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, पोलीस स्टेशन, कुंटूर, ता.नायगाव,जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मो. मोईज खान पठाण, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास महामंडळ
मर्या., नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास
महामंडळ,मर्या.,मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. ही गंभीर बाब आहे, या बाबीची आयोग नोंद घेत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी, वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास महामंडळ,मर्या.,मुंबई यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी, वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास महामंडळ,मर्या.,मुंबई यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०४.२००९रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मो. मोईज खान पठाण, द्वारा - राम संगनवार, ओम निवास,प्र.नि.हा.शाळेजवळ, कैलासनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास महामंडळ,मर्या.,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास महामंडळ,मर्या.,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रभाकर बळीराम राठोड,<br>रा.हरडप, ता.माहूर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्याय,हरडप,ता.माहूर,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रभाकर बळीराम राठोड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्याय,हरडप,ता.माहूर,जि.नांदेड - श्री. ए.एम.जगताप | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर,जि.नांदेड- श्री. ए.व्ही.देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे सादर केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे विस्तृत स्वरुपात माहिती मागितली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत माहिती संकलीत करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आली नाही. आज जन माहिती अधिकारी यांनी माहिती संकलीत केल्याचे दिसून येत आहे. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभाकर बळीराव राठोड, रा.हरडप, ता.माहूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत हरडप,ता. माहूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर,जि.नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कोंडबाराव हनुमंत पुरी,<br>रा.नेवरी, ता.हदगाव,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हादगाव,जि.नांदेड-श्री. घुले निलेश निवृत्ती | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०५.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हादगाव,जि.नांदेड यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १७.०२.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. १४.०८.२००९ रोजी देण्यात आली आहे. त्यासंदर्भातील पोच त्यांच्या अभिलेखावर उपलब्ध आहे. ही बाब कागदपत्रांवरुनही दिसून येत आहे. अपिलार्थीचे द्वितीय अपील दि. २१.०८.२००९ रोजीचे आहे. याच दरम्यान त्यांना दि. १४.०८.२००९ रोजी माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-०९-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कोंडबाराव हनुमंत पुरी,मु.नेवरी, पो.तालग, ता.हृदगाव,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
मु. जानापुरी, पो. वडेपुरी SRT, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्रीमती अनुराधा दि. ढालकरी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. प्रकाश अहिरराव | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये पूर्ण जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेतील धान्य वाटपाबाबत विविध मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यामध्ये अप्राप्त कुपनाची व किती धान्य वाटप झाले व कुपन कोणाकडे आहेत त्यांची नावे,

धान्य वाटप किती व त्याची किंमत, गोदाम तूट वजा जाता एकूण किती धान्य अफरातफर झाले इत्यादी मोघम स्वरुपाची ११ मुद्दयावर माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००१-०२ ते २००५-०६ असा आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची आहे व कालावधी सहा वर्षाचा आहे. तरी जेवढी माहिती उपलब्ध आहे त्याबाबत अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००९ च्या पत्राने कळविण्यात आले. यानंतर दिनांक ०१-०७-२००९ च्या पत्राने पुन्हा प्रतिसाद देण्यात आला. अपिलार्थीस कागदपत्राची पाहणी देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात यापूर्वी देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या माहिती अर्जावरुन त्यांनी मोठ्या कालावधीची व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळाचा वापर करावा लागणार आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो कारण अपिलार्थी यांनी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे व ही बाब अपेक्षित नाही. केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती दिली आहे आणि माहिती पुरविण्याची भूमिका घेतली आहे.

प्रसंगावशात आयोगाच्या असेही नजरेस आणून देण्यात आले आहे की, अपिलार्थीचे १५ ते २० माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी SRT, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ, : अपिलार्थी
रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या

वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ, रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अशोक व्यंकटी पांपटवार,<br>वेताळगल्ली, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अशोक व्यंकटी पांपटवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड - श्री. सय्यद फसीउ्दीन चिस्ती | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक व्यंकटी पांपटवार, वेताळगल्ली, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महमद अब्दुल अजीज, : अपिलार्थी
नेहा शॉपिंग सेंटर, चौक बाजार, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महमद अब्दुल अजीज | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, धर्माबाद,<br>जिल्हा नांदेड - श्री. मंतावार व्हि. एच. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-०७-२००९ च्या माहिती अर्जान्वये एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. या माहितीबाबत न्यायालयीन प्रकरणामुळे त्यांना माहिती देता आली नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात ही बाब मान्य केली तथापि न्यायालयीन प्रक्रिया संपली आहे असे आयोगास अवगत केले. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना सदरची संचिका न्यायालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रती विनामूल्य द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महमद अब्दुल अजीज, नेहा शॉपिंग सेंटर, चौक बाजार, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड - श्री. पैलवाड एन. डब्ल्यू. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०७-२००९ च्या माहिती अर्जान्वये (त्यांना प्राप्त दिनांक १६-०७-२००९) सन २००८-०९ या कालावधीतील गौण खनिजबाबत भरलेल्या रकमेची माहिती व दगड, मुरुम, रेती, गिट्टीच्या ब्रासबाबत माहिती गावनिहाय व

इतर माहिती मागितली आहे.  सदरची माहिती उपलब्ध असून याकरिता रुपये दोन प्रतिपृष्ठ याप्रमाणे ११ पृष्ठासाठी २२ रुपये इतक्या शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस दिनांक ३०-०७-२००९ रोजी कळविले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत.  वरील बाबी आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.  यास्तव अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत शुल्काचा भरणा करावा व त्यानंतर पुढील पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती द्यावी.  या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील या स्तरावर बंद करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. स. वजिर स. अहमद,<br>बरकतपुरा, अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड - श्री. डी. एन. शास्त्री | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०८-१२-२००८ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०९-२०११ रोजी नोंदणीकृत

टपालाने पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांची पोच येणे अजून बाकी आहे तथापि त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना माहिती पाठविली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती प्राप्त झाल्यावर त्यांनी माहितीची पाहणी करावी व अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. या प्रकरणात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कार्यवाही न करण्याचा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भिंगेवार यांच्याकडून प्रमाद घडलेला आहे. याकरिता त्यांना समज देण्यात यावी असे आयोगाचे निदेश आहेत. ही समज जिल्हाधिकारी, नांदेड यांनी द्यावी. भविष्यात माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यावर विहित मुदतीत अर्ज निकाली काढण्याची दक्षता त्यांना घ्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना वर नमूद केल्याप्रमाणे समज द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स. वजिर स. अहमद, बरकतपुरा, अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे,<br>मुख्य संपादक-प्रवक्ता पत्र पेटी क्रमांक ५, मुख्य पोस्ट ऑफिस, नांदेड - ०१ | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड - श्री. डी. एन. शास्त्री | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये अर्धापूर तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते नासेरखान जाफरखान व अ. माजीद शेख महेबुब

यांच्याकडील रॉकेल विक्रीबाबतची विस्तृत माहिती सन एप्रिल २००० ते २००९ या नऊ वर्षाची मागितली आहे. ही माहिती त्रयस्थाकडे उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे पाठपुरावा करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तदनंतर त्रयस्थ रॉकेल विक्रेते यांच्याकडून दिनांक १५-०९-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांना कळविण्यात आले की, छायांकीत प्रती करण्याकरिता खर्च खूप आहे ही बाब अपिलार्थीस सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०९-२०११ च्या पत्राने कळविली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी एप्रिल २००० ते एप्रिल २००९ पर्यंत अशी मोठ्या कालावधीची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील नाहीत त्यांना शुल्क भरुन माहिती घेणे आवश्यक आहे तथापि शुल्काचा भरणा करण्याकरिता उशिराने कळविण्यात आल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप लक्षात घेता माहितीची पाहणी अपिलार्थीस देणे योग्य ठरत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने तसे कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, मुख्य संपादक-प्रवक्ता पत्र पेटी क्रमांक ५, मुख्य पोस्ट ऑफिस, नांदेड - ०१.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा, : अपिलार्थी
रा. दत्तनगर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रावरुन सद्यस्थिती आयोगास अवगत होत नाही. त्याचप्रमाणे आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या

माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा, रा. दत्तनगर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनेश भाऊराव मोरे, : अपिलार्थी
गांधीनगर, नायगांव (बा.), तालुका नायगाव (खै.),
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका नायगाव (खै.),
जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका नायगाव (खै.),
जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिनेश भाऊराव मोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड<br>- प्रतिनिधी - श्री. आर. एन. चौव्हाण, अ. कारकून, पुरवठा, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जिल्हा नांदेड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.),<br>जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-१०-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जानेवारी २००६ ते ऑक्टोबर २००८ या कालावधीत शासनाकडून रेशन दुकानदार यांना खाद्यतेलाच्या झालेल्या पुरवठ्याबाबत माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे रेशन दुकानदारांनी कार्डधारकांना केलेल्या वाटपाची माहिती मागितली आहे. त्यांना आतापर्यंत माहिती मिळाली नाही. असे १०८ दुकानदार आहेत.

जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी दोघेही अनुपस्थित आहेत. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. माहितीचा अर्ज २००८ सालचा आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली नाही ही गंभीर बाब आहे. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी १०८ दुकानदारापैकी काही मोजक्याच दुकानदाराची माहिती स्वेच्छेने घ्यावी ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०९-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनेश भाऊराव मोरे, गांधीनगर, नायगांव (बा.), तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सौ. सुनिता पाटील बाभळीकर, | : | अपिलार्थी |
| बाभळीकर निवास, देशमुख गल्ली, भोकर, जिल्हा नांदेड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०९-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - सौ. सुनिता पाटील बाभळीकर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड - श्री. के. एन. कानगुले | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड<br>- श्री. के. बी. जक्कल | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-०७-२००९ च्या माहिती अर्जान्वये भोकर तालुक्यातील सर्व अर्धघाऊक केरोसीन धारकाबाबत विस्तृत

अशी दिनांक ०१ जानेवारी २००७ ते ३० जून २००९ पर्यंतची माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता रुपये ९१६० इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करावा असे अपिलार्थीस दिनांक २७-०७-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाने कळविले आहे. त्यांना पत्र प्राप्त झाल्याची पोच आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना सदरचे पत्र प्राप्त झाले नाही व त्यांना माहिती मिळाली नाही अन्यथा त्यांनी पैसे भरले असते. अपिलार्थी यांनी आयोगास पुढे त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, यापूर्वी काही माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुन त्यांनी माहिती मिळविली आहे. हे पत्र त्यांना प्राप्त झाले असते तर त्यांनी शुल्काचा भरणा केला असता.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद विचारात घेता आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, विशेष बाब म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीशी संबंधित त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस विशेष बाब म्हणून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०९-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सुनिता पाटील बाभळीकर, बाभळीकर निवास, देशमुख गल्ली, भोकर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.